# कोविड-१९ कालावधीमध्ये मुंबई महानगर क्षेत्रातील शहरी गरिबांना अधिकार आणि मदतकार्य यांची उपलब्धता

## अंतरिम अहवाल

जून २०२०

हा अंतरिम अहवाल आहे. संपूर्ण अहवाल
जुलै २०२० मध्ये उपलब्ध होईल.



# अंमलबजावणी अहवाल

दोन महिन्यांहून अधिक कालावधीपासून देशभर संपूर्ण लॉकडाऊन करणारा कोविड-१९ हा साथीचा रोग केवळ अभूतपूर्व आरोग्य समस्या नसून त्यामुळे अर्थव्यवस्थेवरही विपरीत परिणाम झाला आहे आणि लोकांच्या उदरनिर्वाहाचे अपरिमित नुकसान झाले आहे. याचा सर्वाधिक फटका शहरी भागातील गरिबांना बसला आहे. या शहरी गरीब श्रेणीमध्ये अधिकतर रोजगाराच्या शोधार्थ शहरांकडे स्थलांतरित झालेल्या आणि ग्रामीण भारतात स्थित त्यांच्या कुटुंबियांना पैसे पाठविणाऱ्या स्थलांतरित कामगारांचा समावेश आहे. या स्थलांतरित कामगारवर्गाला कोविड-१९ मुळे उत्पन्नाचे साधन, अन्न आणि निवारा यांपासून अचानक वंचित राहण्याची वेळ आल्याने या कामगारांचे त्यांच्या मूळ गावी मोठ्या प्रमाणावर सामूहिक स्थलांतर सुरु झाल्याचे देशभर निदर्शनास आले. शासनाने लागू केलेल्या लॉकडाऊनमध्ये अनेक आठवडे हालअपेष्टा आणि उपासमार झाल्यानंतर स्थलांतरित कामगारांनी आपापल्या मूळ गावी परतण्याचे सर्वतोपरी शर्थीचे प्रयत्न सुरु केले.

जेव्हा देशामध्ये कोविड-१९ ने बाधित (पॉझिटिव्ह) रुग्णांची संख्या वाढू लागली, तेव्हा 'युथ फॉर युनिटी अँड व्हॉलंटरी ॲक्शन' (युवा) संस्थेने मुंबई महानगर क्षेत्रातील शहरी गरीबांच्या परिस्थितीबाबत गरजांचे जलद मूल्यांकन (रॅपिड नीड्स असेसमेंट) केले. या मूल्यांकनाच्या निष्कर्षांनी लॉकडाऊन सुरु होण्यापूर्वीपासूनच लोकांना सामोरे जावे लागणाऱ्या बिकट परिस्थितीवर प्रकाश टाकला आणि 'युवा'ला पुढील उद्देशांबाबत मध्यस्थीची व्यूहरचना विकसित करण्याकामी साहाय्य केले:

१. दुःखात बुडालेल्या(त्रस्त/पिडितांच्या) लोकांच्या आत्मप्रतिष्ठेचे संरक्षण करण्याहेतू मदतकार्य आणि साहाय्य पुरविणे
२. शासनाने पुरविलेल्या अधिकारांच्या उपलब्धतेची सुनिश्चिती करणे
३. अधिकारांच्या उपलब्धतेमध्ये लोकांच्या प्रतिनिधित्वाची सुनिश्चिती करणे

सदर अंतरिम अहवाल सद्यःपरिस्थितीचा सामना करण्याहेतू पुढील व्यापक उद्दिष्टे सादर करतो:

१. मदतकार्याची गरज असणाऱ्यांची लोकसंख्याशास्त्रीय माहिती तयार करणे
२. शासकीय मदतकार्य कुठवर पोहोचले आहे हे जाणून घेणे आणि त्याची थेट अंमलबजावणी होत असल्याचे सुनिश्चित करणे
३. या अंमलबजावणीतील त्रुटी निवारणाच्या पद्धती ठळकपणे मांडणे
४. समावेशक आणि परस्परसहकार्यावर आधारित मदतकार्यासाठी शिफारशी करणे आणि मदतकार्य अधिकाधिक ठिकाणी पोहोचत असल्याचे, तसेच त्याची कार्यक्षमता सुनिश्चित करणे

या अभ्यासाची व्याप्ती मुंबई महानगर क्षेत्रातील ६ शहरांमध्ये मदतकार्यामार्फत कोरडे अन्नधान्य पुरविण्यात आलेल्या सर्व कुटुंबांपुरती मर्यादित आहे. माहिती संकलनाचे साधन असलेल्या कुटुंब सर्वेक्षण प्रश्नावलीचा वापर वाटपादरम्यान करण्यात आला. या कुटुंबांमध्ये वस्त्या-वसाहतींमधील मदतीची गरज असलेल्या कमी उत्पन्नाच्या कुटुंबांचा समावेश होतो. या पद्धतीच्या मर्यादा कोणत्याही प्रकारच्या सामान्यीकरणाची मुभा देत नाहीत; सदर पद्धती आमच्या वर नमूद उद्दिष्टांच्या अनुषंगाने मदतकार्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी जाणून घेण्यास मदत करते. सदर अहवालाकरिता दि. २० मार्च ते २८ एप्रिल २०२० दरम्यान मदत वाटप करण्यात आलेल्या एकूण ७,५१५ कुटुंबांच्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. अंतिम अहवालामध्ये याहून व्यापक कार्यभाग आणि तपशीलवार निष्कर्ष मांडण्यात येईल.

राज्य शासन व केंद्र शासन यांनी घोषित केलेल्या शासकीय मदतकार्य पॅकेजपैकी कितपत मदतकार्य प्रत्यक्षपणे प्रदान करण्यात आले, हे जाणून घेण्याचा प्रयत्न या माहितीद्वारे करण्यात आला आहे. ७,५१५ कुटुंबांना अधिकार आणि मदतकार्य याबाबत झालेल्या उपलब्धतेच्या निष्कर्षांमध्ये पुढील बाबी प्रकर्षाने जाणवतात:

सार्वजनिक वितरण व्यवस्था (पब्लिक डिस्ट्रिब्युशन सिस्टीम/पीडीएस) यंत्रणेद्वारे मोफत धान्य वाटप प्रक्रिया ही मदतकार्यातील महत्वपूर्ण प्रक्रिया असली तरी रेशनकार्डाअभावी ३७% कुटुंबांना पीडीएसद्वारे सवलतीच्या दरात किंवा मोफत धान्य प्राप्त करणे अशक्य झाले आहे. शासनाची 'उज्ज्वला योजना' मोफत स्वयंपाकाचे इंधन (एलपीजी सिलेंडर) पुरविते. सद्य परिस्थितीत या योजनेची व्याप्ती मदतकार्य रूपाने ३ महिन्यांसाठी वाढविण्यात आली होती. मात्र, सर्वेक्षण करण्यात आलेल्या एकूण कुटुंबांपैकी केवळ ६.३६% कुटुंबांनीच सदर योजनेचा लाभ घेतला. अन्न आणि स्वयंपाकाच्या गॅसची नितांत गरज असणाऱ्या अनेक वंचित कुटुंबांना सदर योजनेचा लाभ घेणे शक्य झाले नाही.

सर्वेक्षण करण्यात आलेल्या कुटुंबांपैकी ३२.२७% कुटुंबांमध्ये कुटुंबातील महिलेच्या नावे बँकेत खाते आहे. मात्र, पैशांची गरज असणाऱ्या सर्व कुटुंबांना महिलांच्या जन धन खात्यामध्ये रोख रक्कम हस्तांतरण योजना उपलब्ध झाली नाही. हीच बाब बांधकामक्षेत्रातील कामगारांच्या खात्यात रोख रक्कम हस्तांतरणाबाबतही आढळून येते. सदर रोख रक्कम हस्तांतरण योजनेची पहिली पायरी म्हणजे 'बिल्डिंग अँड अदर कन्स्ट्रक्शन वर्कर्स (बीओसीडब्ल्यू) वेल्फेअर बोर्डा'कडे नावनोंदणी करणे. सर्वेक्षण केलेल्या बांधकामक्षेत्रातील कामगारांपैकी केवळ ५.२९% कामगारांनी सदर नावनोंदणी केल्याचे सांगितले.

उदरनिर्वाहाच्या पुनर्निर्मितीला आता महत्व प्राप्त होईल आणि स्वयं-नियुक्त समूहांना (सेल्फ एम्प्लॉईड ग्रुप्स) सांपार्श्विक-मुक्त (कोलॅटरल-फ्री) कर्जांची आवश्यकता आहे. मात्र, सर्वेक्षण करण्यात आलेल्या कुटुंबांपैकी केवळ १.१३% कुटुंबांनी त्यांच्यातील एका सदस्याची 'राष्ट्रीय शहरी आजीविका मिशन' (नॅशनल अर्बन लाईव्हलीहुड्स मिशन/एनयूएलएम) मधील स्वयंसेवी समूहामध्ये (सेल्फ हेल्प ग्रुप्स/एसएचजी) नावनोंदणी केल्याचे सांगितले.

# शिफारशी

देशात सर्वाधिक कोविड-१९ बाधित व्यक्तींची संख्या असलेल्या महाराष्ट्रातील परिस्थिती सदर अहवालाला अंतिम स्वरूप देत असेपर्यंत चिंताजनकच आहे. त्याचसोबत लॉकडाऊन शिथिल करण्यात येत आहे. मात्र उदरनिर्वाहाच्या साधनांचे भवितव्य अंधारात असताना गरिबांच्या अस्तित्वाबद्दल अनिश्चितता निर्माण झाली आहे. ही कुटुंबे संकटात आणि कर्जाच्या ओझ्याखाली आहेत. त्यांचे कुपोषण होत असून त्यांच्याकडील बचतही संपुष्टात आली आहे. संकलित माहितीवरून निदर्शनास येते की, या वंचित कुटुंबांना त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी शासनाने घोषित केलेल्या अनेक मदतकार्य पॅकेजची किमान उपलब्धता आहे. याआधीच घोषित करण्यात आलेल्या मदतकार्य पॅकेजेसना विचारात घेऊन केंद्र, राज्य आणि स्थानिक अशा तीनही शासन स्तरावर शिफारशी करण्यात आल्या आहेत. सदर पॅकेजेसची उपलब्धता सुकर व्हावी आणि अंमलबजावणीतील त्रुटी भरून काढता याव्यात या दृष्टीने सदर शिफारशी करण्यात आल्या आहेत. या क्षेत्रातील गरिबांच्या निकडीच्या तात्कालिक गरजा भागविण्याहेतू स्थानिक व राज्य शासनाकडून आवश्यक असलेल्या तात्कालिक कृती सुचविण्यात आल्या आहेत. त्याचसोबत कोविडपश्चात परिस्थिती हाताळण्याच्या दृष्टीने मध्यमकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना देखील सुचविण्यात आल्या आहेत.

## i. गरजूंपर्यंत मदत पोहोचण्याच्या सुनिश्चितीबद्दल शिफारशी

### १. पीडीएसची उपलब्धता: भुकेचा सामना करण्यासाठी आपत्कालीन रेशन कार्डस्

**केंद्र शासन:** मोठ्या प्रमाणात कामगारांकडे आणि कुटुंबांकडे त्यांच्या सध्याच्या निवासस्थानचे रेशन कार्ड उपलब्ध नाही. 'एक राष्ट्र एक रेशन कार्ड' योजना पूर्णतः कार्यान्वित होण्यास आणखी अवधी लागेल. पब्लिक डिस्ट्रिब्युशन सिस्टीम/पीडीएसचे वैश्विकीकरण करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने आपत्कालीन रेशन कार्डस् प्रदान करण्यास परवानगी देण्यास्तव राष्ट्रीय स्तरावर हुकूम जारी केला पाहिजे.

**राज्य शासन:** जर प्रत्येक रास्त भाव दुकानात (फेअर प्राईस शॉप/एफपीएस) किंवा रेशन दुकानात व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या सध्याच्या निवासस्थानानुसार आपत्कालीन रेशन कार्डस् जारी करण्याहेतू एखादी फास्टट्रॅक प्रक्रिया सुरु केल्यास लाखो गरीब कामगारांना अन्नधान्य मिळविण्यास मदत होईल. सदर आपत्कालीन रेशन कार्ड ६ महिन्यांच्या कालावधीसाठी वैध असतील आणि या रेशन कार्डांच्या आधारे लोकांना महाराष्ट्र शासनाने पीडीएस अंतर्गत घोषित केलेले लाभ प्राप्त करणे शक्य होईल. या प्रकरणात पुढे सादर केलेल्या 'तात्कालिक उपाययोजना' विभागात ठोस उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

**स्थानिक शासन:** एखादी व्यक्ती, कुटुंबे किंवा एकत्र राहणाऱ्या स्थलांतरित कामगार यांच्यासाठी रास्त भाव दुकाने नावनोंदणी करून एक रेशन कार्ड जारी करू शकतील, याची सुनिश्चिती हवी. सदर फास्टट्रॅक आपत्कालीन रेशन कार्डांच्या निर्मितीमध्ये एकाच व्यक्तीच्या नावे दोन रेशन कार्डस जारी होऊ नयेत याकरिता प्रत्येक रास्त भाव दुकानाचे परिसरातील झोपडपट्ट्या आणि कमी उत्पन्नगटातील जनवस्ती याबाबत अधिकारक्षेत्र अस्तित्वात आणण्यात यावे.

## २. थेट रोख रक्कम हस्तांतरण सुकर होण्याहेतू बांधकामक्षेत्रातील कामगार आणि घरगुती कामगार यांची त्यांच्या संबंधित मंडळांमध्ये नावनोंदणी

**राज्य शासन:** बिल्डिंग अँड अदर कन्स्ट्रक्शन वर्कर्स (बीओसीडब्ल्यू) वेल्फेअर बोर्डाकडे नावनोंदणी झालेल्या सर्व बांधकाम कामगारांच्या खात्यामध्ये दोन हजार रुपये थेट हस्तांतरित करण्याची घोषणा महाराष्ट्र शासनाने केली आहे. सध्या सदर मंडळाकडे इमारत उपकराच्या माध्यमातून संकलित केलेला रुपये ७४८२.३३ कोटी इतका निधी उपलब्ध आहे. ज्या कामगारांची अद्याप नावनोंदणी झालेली नसेल त्यांना साध्या बिगर-नोकरशाही प्रक्रियेद्वारे नावनोंदणी करण्यास प्रोत्साहन देण्यात आले पाहिजे आणि सदर नावनोंदणीसाठी ९० दिवस काम केल्याचे प्रशस्तीपत्र पुराव्यास्तव जोडण्याचा विद्यमान नियम शासनाने रद्द केला पाहिजे. सदर मंडळामध्ये नावनोंदणी करण्यासाठी (प्राधान्याने ऑनलाईन) फास्टट्रॅक नावनोंदणी प्रक्रिया अस्तित्वात आणल्यास बांधकामक्षेत्रातील कामगारांना प्रचंड मदत होईल. कामगार संघटना, बिगर शासकीय संस्था (एनजीओ) आणि स्वयंसेवी समूह (व्हॉलंटरी ग्रुप्स) सदर प्रक्रियेमध्ये साहाय्य करू शकतात.

**स्थानिक शासन:** ९० दिवस काम केल्याचे प्रशस्तीपत्र पुराव्यास्तव जोडण्यास सक्षम नसल्यामुळे ज्या कामगारांना बीओसीडब्ल्यू बोर्डाकडे नावनोंदणी करण्यात अपयश आले असेल त्यांची पडताळणी स्थानिक प्रभाग कार्यालयाकडून होणे गरजेचे आहे. सदर कामगारांपैकी काही जण एकाच बांधकामस्थळाशी आणि सहयोगी बांधकाम व्यावसायिकाशी निगडित आहेत, मात्र, त्यांच्यापैकी अनेक जणांना केवळ एकच नियोक्ता/कंत्राटदार नाही (ज्यांना 'नाका कामगार' असे म्हणतात). अशा कामगारांच्या पडताळणीकरिता 'गेल्या ३ महिन्यांमधील कार्यस्थळे' यांसारखे काही निकष असावेत (मात्र '९० दिवस काम केल्याचे प्रशस्तीपत्र' हा निकष नसावा.) त्याचप्रमाणे राज्यातील सर्वच घरगुती कामगारांची 'महाराष्ट्र घरगुती कामगार कल्याण मंडळा'कडे (महाराष्ट्र डोमेस्टिक वर्कर्स वेल्फेअर बोर्ड) नावनोंदणी झालेली नाही. मात्र, सध्यस्थिती पाहता त्यांच्यासाठी फास्टट्रॅक नावनोंदणी प्रक्रिया सुरु केल्यास, बीओसीडब्ल्यू उपकर थेट रोख रक्कम हस्तांतरणाचा लाभ घरगुती कामगारांनाही देता येईल.

## ३. लोकांना मूलभूत जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करता येत असल्याची सुनिश्चिती करण्यासाठी बँक खात्यांद्वारे थेट रोख रक्कम हस्तांतरण

**केंद्र शासन:** जीवनावश्यक वस्तू आणि औषधे घेण्यासाठी लोकांना पैशांची नितांत गरज आहे. सध्या जन धन खाते असणाऱ्या महिला आणि बांधकामक्षेत्रातील कामगार यांच्यासाठी रोख रक्कम हस्तांतरण योजनेची घोषणा करण्यात आली आहे. जन धन योजनेची व्याप्ती वाढविली पाहिजे आणि या उद्देशाकरिता 'पीएम केअर्स फंडा'चा विनियोग करता येऊ शकतो.

## ४. सर्व गरीब कुटुंबाना 'उज्वला गॅस योजना' उपलब्ध असल्याची सुनिश्चिती

**केंद्र शासन:** सध्या रेशन मिळणाऱ्या अनेक कुटुंबांना अन्न शिजविणे अशक्य झाले आहे कारण त्यांच्याकडे स्वयंपाकाचे इंधन किंवा गॅस सिलेंडर विकत घेण्यासाठीही पैसे उपलब्ध नाहीत. उज्वला गॅस योजनेमध्ये ऑनलाईन नावनोंदणी करण्याची परवानगी देण्यात यावी आणि कुटुंबांशी त्वरित संबंध प्रस्थापित करण्यात यावेत.

**राज्य शासन:** या योजनेतील ऑनलाईन नावनोंदणीची प्रक्रिया पीडीएस यंत्रणेशी जोडता येऊ शकते ज्याद्वारे रास्त भाव दुकाने संबंधितांना नावनोंदणी प्रक्रियेबाबत सूचना देऊ शकतील आणि रेशनकार्ड असणारी व्यक्ती किंवा कुटुंबे उज्वला योजनेचाही लाभ घेण्यास सक्षम आहेत याची सुनिश्चिती रास्त भाव दुकाने करू शकतात.

**स्थानिक शासन:** सर्व कुटुंबांना स्वयंपाकाच्या गॅसची उपलब्धता आहे आणि त्यांना कार्यक्षम पद्धतीने गॅस सिलेंडर देण्यात येत असल्याची सुनिश्चिती स्थानिक शासन करेल.

## ५. स्वयंसेवी समूहामध्ये (एसएचजी) यांच्या माध्यमातून शहरी उदरनिर्वाहनिर्मिती होत असल्याची सुनिश्चिती

**स्थानिक शासन:** आगामी महिन्यांमध्ये पुनर्वसनाची उपाययोजना या अर्थी 'राष्ट्रीय शहरी आजीविका मिशन' (नॅशनल अर्बन लाईव्हलीहुड्स मिशन/एनयूएलएम) चे कर्ज लाभ अधिकाधिक व्यक्तींपर्यंत पोहोचत असल्याची सुनिश्चिती करणे आवश्यक ठरेल. यामुळे सदर व्यक्तीला स्वतंत्रपणे किंवा समूहामध्ये एकत्रितरित्या कोणत्या ना कोणत्या स्वरूपात उत्पन्नाचे साधन निर्माण करणे शक्य होईल. एनयूएलएमशी जोडलेल्या एसएचजी संख्येने कमी आहेत. स्थानिक शासनाच्या विविध योजनांतर्गत नोंदणीकृत असलेल्या एसएचजींपर्यंत स्थानिक शासनामार्फत एनयूएलएमचा विस्तार करणे महत्वाचे ठरेल. स्थानिक पातळीवर काम उपलब्ध आहे आणि आवश्यक सेवा प्रदान केल्या जात आहेत यांची सुनिश्चिती केल्यास स्थानिक शासनप्रणालीमध्ये एसएचजी शक्तिशाली यंत्रणा ठरतील.

## ii. तात्कालिक, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन आवश्यक कृती

### तात्कालिक कृती

**अपुऱ्या प्रमाणात का होईना पण पीडीएसद्वारे मिळणारी रेशनची धान्ये ही शहरी गरिबांच्या मूलभूत अस्तित्वासाठी महत्वाचे स्रोत आहेत.**

- राज्य शासनाने रेशनच्या धान्यवाटपाबाबत अनेक शासकीय निर्णय (जीआर) जारी केले आहेत. मात्र याविषयीच्या संवादाबाबत मोठी दरी अस्तित्वात आहे आणि ज्यांना रेशनची सर्वाधिक गरज आहे त्यांच्याकडे याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. विविध भाषांमध्ये आणि विविध माध्यमांद्वारे पीडीएसच्या उपलब्धतेबाबत स्पष्ट माहिती सार्वजनिकरित्या अस्तित्वात असली पाहिजे.
- कोणताही प्रक्रियात्मक विलंब न करता प्रति कुटुंब एक वेळेस पात्र असलेला रेशन हिस्सा/कोटा प्रदान करण्यात यावा. तसेच सदर रेशनचे धान्य एप्रिल, मे आणि जून महिन्यांसाठी देण्यात येणार होते. मात्र जुलैनंतरच्या कालावधीसाठी रेशनच्या उपलब्धतेबाबतची माहिती अद्याप अवगत नाही. सदर कोटा पुढील ३ महिन्यांसाठी देण्यात यावा.
- रास्त भाव दुकानांमध्ये सध्या उपलब्ध असलेल्या तांदूळ आणि डाळींव्यतिरिक्त इतर आवश्यक बाबींची उपलब्धता करण्यात यावी. कांदे, बटाटे, तेल, मसाले देण्यात यावेत - प्रारंभी राज्य शासनाने आधी मांडलेल्या बाबी देण्याचे वचन दिले होते.
- रेशनच्या धान्यासोबतच साबण, मास्क्स आणि सॅनिटायझर यांचा समावेश असलेले 'स्वच्छता किट' देण्यात आले पाहिजे.
- ज्यांच्याकडे रेशन कार्ड नसेल त्यांच्यासाठी नोकरशाहीतील विलंब न करता किंवा ओळखपत्राची गरज न ठेवता रेशनच्या धान्याचे वाटप सुरु करण्यात यावे. याबाबत ट्रान्सजेन्डर, वेश्या व्यवसाय करणारी व्यक्ति, एकल माता आणि एकल पिता, सफाई कामगार आणि बेघर व्यक्तींना प्राधान्य देण्यात यावे.

- सध्या लोकांकडे खरेदीची शक्ति नाही. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था सुरळीत कार्यान्वित ठेवण्यासाठी किमान आवश्यक बाबी लोकांना उपलब्ध असल्याचे सुनिश्चित करण्यासोबतच त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट रोख रक्कम हस्तांतरित करणे ही काळाची गरज आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या प्रधानमंत्री जन धन योजनेव्यतिरिक्त आणि नोंदणीकृत बांधकामक्षेत्रातील कामगारांव्यतिरिक्त संबंधित सर्व कुटुंबांना रोख रक्कम हस्तांतरित केली जात असल्याची सुनिश्चितता मदतकार्य आणि पुनर्वसन पॅकेजद्वारे करण्यात आली पाहिजे. पेन्शन, शिष्यवृत्त्या आणि मातृत्व लाभ यांच्याशी निगडित रोख रक्कम हस्तांतरणाव्यतिरिक्त सदर रोख रक्कम हस्तांतरण कुटुंब स्तरावर दरमहा देण्यात आले पाहिजे.

- भाड्याने राहणाऱ्या लोकांच्या बाबतीत घरभाडे चुकविण्याचे प्रकार घडण्यास प्रारंभ झाला आहे आणि लोक बेघर होण्यास

सुरुवात झाली आहे. राज्य शासनाने सर्व झोपडपट्ट्यांमध्ये ३ महिन्यांसाठी भाडेमाफी जाहीर केली पाहिजे.

- ज्या लोकांनी झोपडपट्टीतील निवासस्थान सुधारण्यासाठी गृहकर्ज घेतले आहे त्यांना सदर गृहकर्जाला नमूद कालावधीकरिता कर्जमाफी अंमलात आणण्यात यावी.
- सर्व झोपडपट्ट्यांमध्ये पाणी आणि स्वच्छता यांची उपलब्धता पुरविण्यात यावी. स्थानिक शासनांनी सर्वांसाठी पाण्याच्या उपलब्धतेच्या सुनिश्चितीबाबत उच्च न्यायालय निर्देशित आदेशांचे व इतर कायदेशीर आदेशांचे पालन आणि सार्वजनिक शौचालयांच्या मोफत वापराच्या परवानगीबाबत शासकीय निर्णयांची (जीआर) अंमलबजावणी काटेकोरपणे केली पाहिजे. सर्व सार्वजनिक शौचालयांची नियमितपणे स्वच्छता करण्यात आली पाहिजे.
- आपत्कालीन वैद्यकीय सेवा, सार्वजनिक क्षेत्रांचे निर्जंतुकीकरण, फिरती आरोग्य वाहने (मोबाईल हेल्थ व्हॅन्स) आणि सर्वांसाठी मोफत आरोग्यसेवा वंचित क्षेत्रांमध्ये उपलब्ध असली पाहिजे.
- या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होऊन आलेले कामगार आहेत. त्यांच्यापैकी अनेकजण पुन्हा त्यांच्या स्वगृही (मूळ गावी) परतण्याच्या विचारात आहेत. शासनाने पुढील दोन आठवड्यांमधील संभाव्य रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक नियमितपणे प्रकाशित करावे. यामुळे मुंबई शहराला अत्यावश्यक सेवा प्रदान करणाऱ्या अनेक लोकांच्या मनातील भीती नष्ट होईल. (दि. २८ मे २०२० रोजी) सर्वोच्च न्यायालयाने निर्देशित केलेल्या आदेशान्वये स्थलांतरित कामगारांच्या प्रवासाच्या तिकीटाच्या आणि भोजनाच्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी राज्य शासनाची असेल. याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.
- या साथीच्या रोगामुळे ६ महिन्यांपेक्षा कमी वयाच्या बाळांचे लसीकरण थांबविण्यात आले आहे; सदर बाळांचे लसीकरण ठराविक मुदतीत होत असल्याचे सुनिश्चित करण्यासाठी अशा सर्व बाळांचा कसून आढावा (फॉलो अप) घेणे गरजेचे आहे.
- नगरसेवकांच्या नेतृत्वाखाली प्रभागस्तरावर बाल संरक्षण समित्या सक्रिय केल्या पाहिजेत. यामुळे मुलांना स्वास्थ्य, पोषण आणि संरक्षण देताना स्थानिक पातळीवरील प्रणालींमध्ये समन्वय साधला जाईल.
- आगामी महिन्यांमध्ये अनधिकृत वसाहती, झोपडपट्ट्या आणि रस्त्यावर राहणाऱ्या मुलांसाठी शिक्षणाची उपलब्धता होणे अतिशय महत्वाचे ठरणार आहे. शैक्षणिक संस्थांना लॉकडाऊन लागू राहणार असल्यास शासकीय आणि खाजगी शाळांनी मुलांसाठी तंत्रज्ञानाची मोफत उपलब्धता होण्यास्तव आवश्यक व्यवस्था करावी.

## मध्यमकालीन कृती

- आगामी महिन्यांमध्ये असंख्य कामगार बेरोजगार राहणार असल्यामुळे शहरी रोजगार योजना आखण्यात आली पाहिजे. सदर योजना शहरी भागातील मूलभूत सेवा आणि सार्वजनिक पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) सुधारण्यास चालना देणाऱ्या रोजगाराशी जोडण्यात आली पाहिजे.
- स्वयं-नियुक्त कामगारांसाठी व्यवसायाकरिता भांडवलाची उपलब्धता असल्याचे सुनिश्चित करणारे स्टिम्युलस पॅकेज प्रदान करण्यात आले पाहिजे. सदर बाब 'एनयूएलएम एसएचजी'ना देण्यात येणारे सांपार्श्विक-मुक्त (कोलॅटरल-फ्री) कर्ज आणि रस्त्यावरील विक्रेत्यांना देण्यात येणाऱ्या पीएम स्वनिधी कर्जपुरते मर्यादित राहता कामा नये.
- सहा वर्षांखालील बालके, गरोदर माता आणि स्तनदा माता यांच्या वाढीची देखरेख सामान्यपणे अंगणवाडी सेविका करतात. ही बाब दूरध्वनीवरून करणे गरजेचे आहे आणि पोषकतत्वांच्या आवश्यकतांची तरतूद प्रभाग अधिकाऱ्यांच्या भागीदारीतून एकात्मिक बाल विकास सेवेद्वारे (इंटिग्रेटेड चाईल्ड डेव्हलपमेंट सर्व्हिसेस/आईसीडीएस) करण्यात यावी.
- सध्या क्षयरोग आणि इतर संसर्गजन्य रोगांविषयीचे औषधोपचार आरोग्य केंद्रे आणि इस्पितळांमधून अतिशय तुरळक प्रमाणातच उपलब्ध आहेत. आरोग्य केंद्रांनी रुग्णांना सदर औषधोपचार अतिशय पद्धतशीरपणे प्राप्त करून घेऊ दिले पाहिजेत.

- साथीच्या रोगाशी लढण्यासाठी उभारण्यात आलेली बेघरांसाठीची आश्रयगृहे पुढेही कायम ठेवण्यात आली पाहिजेत. सदर आश्रयगृहे 'एनयूएलएम'च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रदान करण्यात आली पाहिजेत.

## दीर्घकालीन कृती

- महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम यान्वये झोपडपट्ट्यांना अधिसूचित करण्यात आले पाहिजे आणि सर्व मूलभूत सेवा (पाणी, आरोग्य, रस्ते, सांडपाण्याच्या संस्था) रहिवाश्यांच्या संख्येनुरूप देण्यात येत असल्याचे सुनिश्चित केले पाहिजे. सध्या ही अतिशय दीर्घ आणि किचकट प्रक्रिया आहे आणि झोपडपट्ट्यांमधील लोकांना पुरेशी स्वच्छता आणि दर्जेदार जीवन सुनिश्चित करणाऱ्या मूलभूत सुविधा मिळण्यापासून प्रतिबंध करतात.
- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये सुधारणा करण्यात आली पाहिजे की जेणेकरून झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प 'राष्ट्रीय इमारत कोड'ने (नॅशनल बिल्डिंग कोड) निर्देशित केलेली घनता कायम राखतील. (उच्च फ्लोअर स्पेस इंडेक्स/एफएसआय म्हणजे अधिक घनता आणि झोपडपट्टी पुनर्वसन इमारतींबाबत याचा अर्थ होतो की, लहान घरांमध्ये तडजोड केलेल्या परिस्थितीमध्ये अधिक लोकांचे राहणे.)
- नगररचनेने सद्यस्थितीत ठोस पावले उचलली पाहिजेत. महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियमानुसार झोपडपट्ट्यांचे नियोजन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून (एसआरए) केले जाते. झोपडपट्ट्या एसआरए अंतर्गत विशेष नियोजन क्षेत्र (स्पेशल प्लॅनिंग एरियाज/एसपीए) राहू नयेत. सदर विषाणूचा प्रतिबंध करणे ही स्थानिक प्रशासनाची जबाबदारी आहे आणि स्थानिक प्रशासनाकडून त्याबाबत दीर्घकालीन नियोजन होणे अतिशय महत्वाचे आहे.
- प्रभावी स्थानिक प्रशासनासह स्थानिक क्षेत्र नियोजन विकसित केले पाहिजे. स्थानिक क्षेत्र योजनांमध्ये त्या क्षेत्राच्या विद्यमान लोकसंख्येला प्रदान करण्यात येणारे शिक्षण, आरोग्य सेवा, स्वच्छता सेवा यांचा समावेश असणे गरजेचे आहे.
- यासोबत प्रभाग, क्षेत्र आणि गल्ली/मोहल्ला यांमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण होण्यासाठी घटनेतील ७४ व्या घटना दुरुस्ती कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. वरिष्ठांकडून कनिष्ठांकडे (टॉप-डाऊन) आदेश येण्याच्या पद्धतीवर अवलंबून न राहता योग्य प्रतिसाद देण्याहेतू विलक्षण सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक गरजा समजावून घेणाऱ्या आपत्कालीन नियोजन समित्यांची स्थापना करण्यासाठी स्थानिक शासन विद्यमान सामुदायिक नेतृत्व आणि बिगर-नफा संस्थांशी भागीदारी करू शकतात.
- अलीकडेच केंद्र शासनाने जाहीर केलेली 'प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) रेंटल हाऊसिंग योजना' स्वागतार्ह पाऊल आहे. मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट ऑथॉरिटी/एमएमआरडीए) यांच्याकडून रेंटल हाऊसिंगचे पुनरुज्जीवन होऊ शकते. मात्र, रेंटल हाऊसिंग योजनेस कार्यान्वित करण्यासाठी स्थानिक शासन आणि राज्य शासन या दोघांचे सहकार्य गरजेचे असेल आणि त्याकरिता पुरेसे साहाय्य पुरविणे गरजेचे असेल.

# ABOUT YUVA

Youth for Unity and Voluntary Action (YUVA) is a non-profit development organisation committed to enabling vulnerable groups to access their rights. YUVA encourages the formation of people's collectives that engage in the discourse on development, thereby ensuring self-determined and sustained collective action in communities. This work is complemented with advocacy and policy recommendations. Founded in Mumbai in 1984, currently YUVA operates in the states of Maharashtra, Madhya Pradesh, Odisha, Assam and New Delhi.

At the community-level, through an integrated 360-degree approach, YUVA delivers solutions on issues of housing, livelihood, environment and governance. Through research, YUVA creates knowledge that enhances capacity building. Through partnerships in campaigns, YUVA provides solidarity and builds strong alliances to drive change.

